एकोणतीस ऑगस्टला मनपाची अंतिम प्रभाग रचना

नाशिक - प्रतिनिधी

आगामी नाशिक महापालिका निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे करण्याचे आदेश १० जून रोजी प्राप्त झाल्यानंतर मनपा प्रशासनने त्वरित कारवाईला सुरुवात केली होती. तर गुरुवारी प्रभाग रचना प्रक्रियांचे वेळापत्रक देखील शासनाने काढले असून ते आदेश मनपाला मिळाले आहे. त्यानुसार २९ ऑगस्टला मनपाची अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार आहे.

शासनाने मुंबई मनपासह राज्यातील महापालिकेला आदेश देत प्रभाग रचना तयार करण्याचे कार्यक्रम दिले. संपूर्ण प्रक्रिया नऊ टप्प्यात होणार असून प्रगणक गटाची मांडणीस सुरुवात झाली असून १६ जूनपर्यंत त्यास अवधी आहे. प्रभाग रचनेचे काम ११ जून ते ४ सप्टेंबर कालावधीत होणे अपेक्षित असून



तसे निर्देश शासनाच्या नगरविकास विभागाने मनपा दिले आहेत. प्रभाग रचनेसंदर्भात शासनाने कालबध्द कार्यक्रमातर्गत घालून दिलेल्या कालावधीत टप्पेनिहाय कामाची कार्यवाही पूर्ण करायची आहे.

प्रभाग रचना कार्यक्रम मनपाला प्राप्त

करण्यात आली आहे. शासनाने महापालिकेला निर्देश देताच कार्यवाहीला वेग आला आहे. नाशिक महापालिकेसाठी यंदाही चार सदस्यांचाच प्रभाग असणार आहे. यामध्ये बुधवार (दि.११) पासूनच प्रगणक गटाची मांडणीला सुरवात प्रभाग रचनेसंदर्भातील कामाची जबाबदारी मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे आहे.

१७ जून ते ७ जुलैदरम्यान जनगणेची प्राप्त माहिती तपासणे, स्थळ पाहणी, गुगल मॅपद्वारे प्रभागाचे नकाशे तयार करणे, प्रत्यक्ष प्रभागात जाऊन हद्दी तपासणे, प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे आदी कामे होणार आहे. यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाला होणार. त्यावेळी आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देण्यात येइल.

२२ ते ३१ जुलै दरम्यान प्रारुप प्रभाग रचना जाहीर करुन त्यावर हरकती मागविल्या जातील. नंतर आयोगाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून हरकतीवर सुनावणी घेतली जाईल.

१२ ते १८ ऑगस्ट दरम्यान सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी तयार केलेली प्रभाग रचना निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी पाठवली जाइल. यानंतर २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत आयोगाकडून अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार.

थोडक्यात

सुनील केदार यांचा सत्कार

पंचवटी । भारतीय जनता पक्षाच्या नाशिक शहराध्यक्षपदी सुनील केदार यांची नुकतीच बहुमताने निवड झाल्याबद्दल स्वराज्य परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात स्वराज्य परिवाराचे प्रमुख शिवचरित्रकार भाऊसाहेब नेहरे, सचिव विनायक दादा सूर्यवंशी, भाजप कार्यकर्ते युवराज सैंदाणे, महिला प्रमुख रेखा नेहरे, महिला अध्यक्ष मोहिनीताई भगरे, तसेच राज्य उपाध्यक्ष विद्याताई शिंदे यांच्या हस्ते केदार यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

महसूल कार्यालयात वृक्षारोपण

नाशिकरोड । आपले झाड, आपली सावली या उपक्रमांतर्गत महसूल आयुक्त कार्यालयात आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी अपर आयुक्त अरविंद लोखंडे, तहसीलदार स्मिता पागेरे, सहायक आयुक्त मनोज चौधरी, सहायक आयुक्त रणदिवे, महसूल अधिकारी महेश शहाणे, सहायक महसूल अधिकारी संतोष तरटे, महसूल सहायक जितेंद्र बैरागी, संदीप भोळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन बीइंग कॉमन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम कदम, ड्रीम ग्रीन पेट्रो केम प्रा. लि. चे संचालक हर्षद निकम, गुरमित सिंग, प्रवीण शेट्टी, सागर धाराक, मंगेश लवटे, विकी नालकर, अतुल सोनी, हर्षल नामदे यांनी केले.

'स्वानंद'चा वर्धापनदिन

नाशिकरोड । शिखरेवाडी येथील स्वानंद ज्येष्ठ नागरिक संस्थेचा सतरावा वर्धापनदिन नुकताच मोठ्या उत्साहात विविध उपक्रमांचे आयोजन करत संपन्न झाला.महिला आणि पुरुष सभासदांनी पाककला तसेच नैसर्गिक पानाफुलांच्या पुष्परचना स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. पुष्परचना स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय क्रमांक अनुक्रमे सुनंदा गोसावी आणि प्रदीप भालेराव यांनी तर पाककला स्पर्धेत वैजयंती चंद्राप्रे आणि कल्पना गोखले यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावला. पुष्परचना स्पर्धेचे परीक्षक म्हणून सुधाकर सोनवणे आणि ॲड.गोविंद पांडे यांनी तर पाककला स्पर्धा परीक्षक म्हणून शिल्पा वैद्य आणि सदानंद पालकर यांनी काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष जयराम कुलकर्णी यांनी परिक्षक आणि स्पर्धकांचा सत्कार केला.

रॅपिड चेस स्पर्धा

नाशिक । बॉटविनिक चेस स्कूलतर्फे एक दिवसीय रॅपिड चेस स्पर्धा आयोजित केली आहे. रविवारी (१५ जून) ही स्पर्धा तपोवन लिंकरोडवरील रामीबाई भवन येथील नाशिक सिंधी पंचायतच्या सभागृहात पार पडणार आहे. इच्छुकांना प्रवेशिका सादर करण्यासाठी शनिवार (१४ जून) रात्री ९ वाजतापर्यंत मुदत असेल, अशी माहिती स्पर्धा आयोजक व बुद्धिबळचे प्रशिक्षक सुनिल शर्मा यांनी दिली आहे.

साहित्य भारतीची शहर कार्यकारिणी

नाशिक । अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीची नाशिक शहर कार्यकारिणी २०२५-२६ शंकराचार्य संकुल येथे झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. यात अध्यक्षपदी प्रसिद्ध लेखिका तन्वी अमित यांची, उपाध्यक्षपदी स्वप्नील कुलकर्णी तर कार्याध्यक्षपदी मनीषा दिघे यांची निवड करण्यात आली.

महायुती सोडून अन्य कोणत्याही पक्षांशी युती करणार

वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टी तसेच त्यांचे मित्रपक्ष(महायुती) सोडून अन्य कोणत्याही पक्षांशी युती करण्याची आमची तयारी आहे. मात्र ती करतांना आम्ही आमच्या स्वाभिमानाशी तडजोड करणार नाही, असे स्पष्ट प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

कार्यकर्ता मेळावा आणि कृतज्ञता सोहळ्याच्या निमित्ताने नाशकात आले असता सुजात आंबेडकर शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेत बोलत होते. भाजपा सरकारविरुद्ध वापुढेही आम्ही ताकदीने लढू असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले. कार्यकर्ता मेळाव्याच्या वेळी कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह जाणवला. आदिवासींचा निधी अन्यत्र वळविण्यात आल्याने त्या विरोधात वंचित बहुजन आघाडीतर्फे

आदिवासी विकास आयुक्त कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला आणि आश्रम शाळेतील समस्यांसह विविध मागण्यांचे निवेदन यावेळी आदिवासी विकास आयुक्तांना सादर करण्यात आले, असेही सुजात यांनी निदर्शनास आणले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलनात बसलेले प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता वंचित बहुजन आघाडीची अमरावतीची टीम त्यात लक्ष घालीत आहे, असे उत्तर सुजात यांनी दिले. अहमदाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटनेबाबत विचारले असता ही घटना अत्यंत दुर्दैवी असून मृतांच्या कुटुंबीयांना परमेश्वर दुःख पचविण्याची शक्ती देवो, अशा शब्दात त्यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. सरकारच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेला सरकार प्राधान्य देत नाही हेच या दुर्घटनेवरून निदर्शनास येते असेही ते पुढे म्हणाले.

आगामी महापालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचनेसंदर्भात सरकारतर्फे जो निर्णय जाहीर करण्यात आला, त्याला वंचित बहुजन आघाडी आक्षेप घेणार का, असा प्रश्न विचारला असता कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्याबद्दल काय ते ठरवले जाईल, असे सुजात यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला महानगरप्रमुख अविनाश शिंदे, वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय सदस्य दिशा पिंकी शेख, उपाध्यक्ष अरुण जाधव, युवक प्रदेश कार्यकारी सदस्य चेतन गांगुर्डे, महिला जिल्हाध्यक्ष उर्मिला गायकवाड, माथाडी कामगार संघटनेचे महासचिव सुनील साळवे, दीपक पगारे, रवी पगारे, तुकाराम मोजाड, युवक जिल्हाध्यक्ष दामोदर पगारे, माहीर गजबे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी, मनपा आयुक्तांचा टाळ वाजवत वारीत सहभाग

नाशिक । प्रतिनिधी

श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखीचे आगमन नाशिक शहरात झाल्यावर काल (दि.१२) सकाळी या पालखीचे स्वागत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्यासह मनपा आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी पालखीचे स्वागत करून भावपूर्ण दर्शन घेतले.

रामकृष्ण हरी, जयहरी विठ्ठल माऊलीच्या गजरात जिल्हाधिकारी जलज शर्मा आणि मनपा आयुक्तांनी टाळ वाजवत पंढरपूरला प्रस्थान होणाऱ्या वारीत सहभाग नोंदवला.या वारीत मनपाचे सर्व अधिकारी सहभागी झाले. अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपआयुक्त लक्ष्मीकांत साताळकर, नितीन पवार, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नितीन पाटील, संदेश शिंदे, नितीन राजपूत, गणेश मैदड, रवी बागुल, प्रशांत बोरसे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदी अधिकारी सहभागी झाले.

स्वानंद बेदरकर यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन

नाशिक । प्रतिनिधी

शब्दमल्हार प्रकाशन संस्थेचे संपादक आणि प्रसिद्ध व्याख्याते स्वानंद बेदरकर यांच्या पावसाच्या गर्भतळी या कवितासंग्रहाचे प्रकाशन रविवारी (दि. १५) होणार आहे.

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या नवलमल फिरोदिया सभागृहात सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. नाटककार, अभिनेते आणि दिग्दर्शक मकरंद देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होईल. पुस्तकावरील विशेष भाष्य ज्येष्ठ समीक्षक रणधीर

अभिनेते, दिग्दर्शक मकरंद देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती

शिंदे हे करणार असून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

पावसाच्या गर्भतळी या पहिल्याच कवितासंग्रहात त्यांच्याकडून पाऊस हा विषय केंद्रवर्ती ठेवून सगळ्या कवितांचे लेखन झाले आहे. पावसावर मानवी आरोपन हे या संग्रहाचे वैशिष्ट्य असून वेगवेगळ्या रूपातील पावसाच्या कविता या संग्रहात रसिक वाचकांना वाचायला मिळतील. मराठीतील ख्यातनाम समीक्षक रणधीर शिंदे यांची संग्रहाला प्रस्तावना आहे. कवितांच्या संग्रह प्रकाशनाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन शब्दमल्हार प्रकाशनच्यावतीने करण्यात आले आहे.

'सूर आमच्या घरी' संगीत मैफिल

नाशिक । अभिजात शास्त्रीय संगीताच्या प्रसार, प्रचारासाठी 'सूर आमच्या घरी' या अनोख्या मैफिलीचे आयोजन सुला वाईनचे उपाध्यक्ष संजीव पैठणकर व रुपाली पैठणकर यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त केले. 'सूर आमच्या घरी' ही मैफील विश्वास गार्डन येथे सकाळी ७ वाजता संपन्न झाली. मैफिलीत ज्ञानेश्वर कासार यांचे गायन संपन्न झाले. ज्ञानेश्वर कासार यांनी राग वाचस्पती बडाख्याल 'मन राम भजो', मध्यलय त्रिताल ख्याल 'ऐसे मन भाग मेरा' सादर केला. त्यानंतर द्रुत एकताल ख्याल 'माता भवानी' सादर केला. वरील तिन्ही रचना ज्ञानेश्वर यांच्या स्वरचित होत्या.

तुळजाभवानी सेवाभावी संस्थेस पुरस्कार

नाशिक। उत्तर महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तुळजाभवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेस सामाजिक न्याय विभागाचा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार मुंबई येथील शानदार सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

संस्थेच्या अध्यक्षा उषाताई गालफाडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात १० जून रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर रोहियो मंत्री ना.भरतशेठ गोगावले,

उषाताई गालफाडे यांनी स्वीकारला पुरस्कार

जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे आदी होते. असा पुरस्कार पटकावणारी तुळजाभवानी बहुउद्देशीय सेवाभावी ही जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सामाजिक न्यायमंत्री आदींच्या प्रमुख उपस्थितीत माझ्या संस्थेला हा पुरस्कार मिळाला आणि तो स्वीकारताना मला खूप आनंद झाला आहे, असे उषाताई गालफाडे म्हणाल्या.

वारकऱ्यांना मविप्र रुग्णालयाकडून आरोग्यसेवा

नाशिक । दरवर्षीप्रमाणे यंदाही संतश्रेष्ठ निवृत्ती महाराज आषाढी एकादशी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय व संशोधन केंद्रातर्फे विनामूल्य आरोग्य सेवा पुरविली जाणार आहे.

यासाठी सुसज्ज असे आरोग्य पथक तयार करण्यात आले असून, वारकरी बांधवांना थेट पंढरपूरपर्यंत आरोग्य सेवा दिली जाणार आहे, अशी माहिती मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी दिली.

शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लखंडे यांच्या सहकार्याने यंदाही दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी मविप्र रुग्णालयाचे आरोग्य पथक २४ तास वारीमध्ये कार्यरत राहणार आहे. या पथकामध्ये १७ प्रशिक्षित डॉक्टर, ०२ रुग्ण सहायक, रुग्णवाहिका चालक असेल. वारकरी बांधवांना प्रथमोपचार, मोफत तपासणी व औषधोपचार सेवा दिली जाणार आहे, असे यावेळी अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे व वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत कवडे यांनी सांगितले.

शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत कवडे यांनी रुग्णवाहिकेचे पूजन केले. यावेळी कम्युनिटी मेडिसिन विभागप्रमुख डॉ. बालाजी अलमले, डॉ. अजित पाटील, इंटर्नशिप विभागाच्या इन्चार्ज डॉ. सुनिता पवार, डॉ. यशोवर्धन तोतला, किशोर गायकवाड, किरण पवार, गौरव ढिकले उपस्थित होते.

आग्र्यातून नाशकात फसवणूक, दोघांवर गुन्हा दाखल

नाशिक। ट्रस्टमध्ये भागीदारी देण्यासह टेंडरचे आमिष दाखवून उत्तर प्रदेशातील आग्रा येथील बनावट ट्रस्टच्या संशयिता संचालकांनी आडगाव शिवारात राहणाऱ्या व्यावसायिक महिलेकडून दोन लाख रुपये उकळले आहेत. याबाबत आडगाव पोलीस ठाण्यात दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृषाली गणपत दुबे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्या १२ सप्टेंबर २०२४ ते ११ जून २०२५ पर्यंत नांदूर लिंकरोड येथे व्यवसाय सांभाळत असताना, त्यांना संशयित पृथ्वेद्र त्यागी व नंदन हजरा (रा. एफ ५, अण्णा आयकॉन कॉम्प्लेक्ससमोर, देवीराम फूड सर्कल, पश्चिमपुरी रोड, आग्रा) यांनी संपर्क साधला. त्यावेळी पी टेक एज्युकेशनल ट्रस्ट कंपनीचे चेअरमन संशयित पृथ्वेद्र त्यागी व सहकारी नंदन हजरा यांनी ट्रस्ट कंपनीत भागीदारी देण्याचे व महाराष्ट्रात टेंडर देण्याचे आमिष दाखविले. विश्वास संपादन करुन दुबे यांच्याकडून त्यासाठी दोन लाख रुपये सिक्युरिटी डिपॉझिट ट्रस्टमध्ये जमा करवून घेतले. हे पैसे जमा होताच संशयितांनी संपर्क कमी केला. टेंडर व भरलेले डीपॉझिट मिळत नसल्याने दुबे यांना संशय आला. त्यांनी अधिक तपास केला असता फसवणूक झाल्याची जाणीव झाली. त्यांनी आडगाव पोलीस ठाणे गाठून फिर्याद नोंदविली.

विकसकांवर चौकशीचा फास आवळला

डायोसेशन भूखंड घोटाळा; तेरा संशयितांना अंतरिम जामीन

नाशिक । प्रतिनिधी

बनावट कागदपत्रे उपनिबंधक कार्यालयात सादर करुन शरणपूर रोडसह आजूबाजूच्या गावठाणातील तीनशे कोटी रुपयांच्या बाजारमूल्याचे भूखंड परस्पर बळकावणाऱ्या नाशिकमधील बड्या उद्योजकांसह विकसकांच्या अडचणीत आणखीन वाढ झाली आहे. सरकारवाडा पोलिसांनी सर्वच सदतीस संशयितांची सखोल चौकशी करण्याचे ठरविले असून त्यांना नोटीसा बजावण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

शरणपूररोडवरील जुन्या पोलीस आयुक्तालयासह परिसरातील सहा एकर जमिनीचे कायदेशीर अधिकार नसताना बांधकाम व्यावसायिक अशा ३७ जणांविरोधात फसवणुकीसह दस्तावेज बनावटीकरण कायद्याच्या गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, या गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी पोलिसांनी

ठळक मुद्दे

* दाखल गुन्ह्यात कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(४), ३३६(२), ३३८, ३३६(३), ३४०(२), २३६, २३७, ६१(२) सह कलम ३(५) अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यांचा समावेश
* पुढील सुनावणी १९ जून रोजी
* हमदस्तची मागणी न्यायालयाकडून मंजूर

झाला होता. यासंदर्भात, सरकारवाडा पोलिस ठाण्यात ट्रस्टच्या १६ सदस्यांसह नाशिकमधील नामांकित २१ बांधकाम व्यावसायिक अशा ३७ जणांविरोधात फसवणुकीसह दस्तावेज बनावटीकरण कायद्याच्या गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, या गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी पोलिसांनी प्रकरणाचे कागदपत्रे गोळा करण्यावर भर दिला असून संबंधित उपनिबंधक कार्यालय, महसूल प्रशासन व महापालिकेस पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार पुराव्यांचे संकलन सुरु झाले आहे. दरम्यान सदतीस संशयितांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयात धाव घेतली असून यातील तेरा संशयितांना अटी व शर्थीनुसार अंतरिम जामीन मंजूर केला आहे. दरम्यान, सुनावणीवेळी संशयितांच्या वकीलांनी सदरहू जमिनीवर(भूखंड) पोलीस खात्याचे वैयक्तिक हितसंबंध आहेत. त्यामुळेच आडगाव पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक तुषार रतन देवरे यांच्या माध्यमातून उद्योजक व विकसकांवर गुन्हा दाखल करण्यात आलाचा दावा केला आहे.

वकिलांकडे आर्जव

दुसरीकडे या 'भूकांडा'त अडकलेला हात अलगद बाहेर काढण्यासाठी संशयितांनी नामांकित सनदी लेखापाल व निष्णांत वकिलांचे दारे ठोठावून 'वाचवा वाचवा' अशी विनवणी केल्याचे कळते. सदर्तसपैकी दोन ते तीन संशयित ज्येष्ठ नागरिक असून इतर अर्जदार प्रतिष्ठित व्यावसायिक असल्याने त्यांच्या अटकेपूर्वी त्यांना ७२ तास आधी नोटीस देणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले. दरम्यान, संशयितांच्या अटकपूर्व जामीनाच्या अर्जांना सरकारवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक तथा तपासाधिकारी सुरेश आव्हाड व फिर्यादी आणि सहायक निरीक्षक तुषार देवरे यांनी कडाडून विरोध केला असला तरी त्यांना काहीसे अपयश येतांना दिसत आहे.

चॅनेल निवेदकावर खंडणीचा गुन्हा

नाशिक। प्रतिनिधी

मल्टिकुझिन रेस्टोबारमध्ये झालेल्या दोन गटांतील तुफान हाणामारीचा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत 'लक्ष न्यूज' लोकल युट्यूब चॅनलच्या निवेदकाने(अँकर) हॉटेल व्यावसायिकाकडून खंडणी मागितल्याची फिर्याद सातपूर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. त्यानुसार, खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित कौशल वाखारकर (वय २९, रा. पंचवटी) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

सातपूर येथील आयटीआय सिग्नलजवळ डॉ. बिपीन पुरुषोत्तम पटेल(वय ५१, रा. अष्टविनायक कॉलनी, गंगापूर रोड) यांचा औरा मल्टिकुझिन रेस्टोबार आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, ९ जून रोजी रात्री आठ वाजता वाखारकरने 'दहा हजार रुपये द्या, अन्यथा लक्ष न्यूज या नावाच्या चॅनेलच्या सोशल मीडिया अकांऊटवर औरा हॉटेलमधील हाणामारी व भांडणाचे लाईव्ह व्हिडीओ व्हायरल करेल', अशी धमकी दिली. दरम्यान, वाखारकरने बारमधील हाणामारीचे व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल देखिल केले आहेत.

या गोष्टीचा मानसिक त्रास व समाजात मानहानी तसेच हॉटेल व्यवसायाची बदनामी झाल्याचे पटेल यांनी फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान संशयिताने खंडणीसाठी हॉटेलचे अमोल दहाडे याला हातपाय तोडून जबर दुखापत करण्याची भिती दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही पटेल यांनी नमूद केले आहे. दरम्यान, धमकी व भिती दाखवून खंडणी मागून ती उकळणाऱ्यांवर यापुढे कठोर कारवाई केली जाणार आहे, असे समजते.

त्या दंगलीत संशयित

संशयित वाखारकर याच्यावर शिंगाडा तलाव येथे जुलै २०२३ मध्ये उसळेल्या दोन गटांतील दंगलीत सहभागी असल्याचा गुन्हा दाखल आहे. शरणपूर रोडवरील राजीव गांधी भवनसमोरील व्यावसायिक संकुलात वाखारकर याच्या लक्ष न्यूज चॅनेलचा स्टुडिओ असून तपास उपनिरीक्षक राहुल नळकांडे करत आहेत. दरम्यान, औरा बारमध्ये सुरु असलेल्या हाणामारीचे कव्हरेज वाखारकरने मोबाईलमध्ये कैद करुन ते व्हायरल केले असून त्याचा मोबाईल जप्त केला जाणार आहे.